REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# लोकपाल : एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड**
**लोकप्रशासन विभाग प्रमूख , धारेश्वर शि.स.औ.बाद संचिलत , कला व विज्ञान महाविद्यालय,**
**चिंचोली (लि.) ता. कन्नड जि. औरंगाबाद.**

**प्रस्तावणा:-**

"भारतामध्ये प्रशासन प्रक्रियेतील जनतेच्या हक्काचे संरक्षण व अन्यायाचे निवारण करण्यासाठी लोकपाल व लोकायुक्त हे संसदेला जबाबदार असणारे अधिकारी शासनाने नेमावेत. भारतासहित सर्वच लोकशाही प्रधान देशांनी लोकपाल व लोकायुक्त या संस्थाची आवश्यकता व महत्व मान्य केलेले आहे". भारतात लोकपाल संस्थेच्या आवश्यकते संदर्भात श्री. सी. डी. देशमूख यांनी व १९६३ माजी




खासदार डॉ. एल.एम. सिंघवी यांनी लोकसभेत प्रथम लोकपालाचा प्रश्न उपस्थित करुन भारतीय प्रशासनात निर्माण होणारा अन्याय, भ्रष्टाचार, लाचलूचपत, पक्षपातीपणा यांना प्रतिबंध घालण्यासाठी लोकपाल ही संस्था कशी महत्वाची आहे यासंबंधी त्यांनी समर्थन करुन लोकपाल पदाची आवश्यकता व महत्व पटवून दिले व असे पद निर्माण करणे गरजेचे असल्याचे विचार मांडले आहेत.

आज प्रशासनातील लोकशाही शासन व्यवस्थांना जगभर भेडसावणारा "भ्रष्टाचार हा न संपणारी समस्या असल्याचे जानवते आहे. प्रशासकाच्या व राजकीय पदाधिका-यांच्या कृतिविरुध्द आणि निर्णयाविरुध्द नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी तसेच निवारण करण्यासाठी नियुक्त केलेल्या शासकीय अधिका-यास लोकपाल असे म्हणतात.राजकीय नेत्यांनी आणि प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचा-यांनी प्राप्त असलेल्या अमर्याद अधिकाराचा गैरवापर करुन चालविलेल्या भ्रष्टाचाराला निपटून काढण्यासाठी लोकपाल विधेयक संमत होणे गरजेचे आहे. भ्रष्टाचार आज प्रशासकीय व्यवस्थेत शिष्टाचार होत आहे. शासन आणि प्रशासनातील मोठ-मोठया अधिका-यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप होत आहेत. परंतू शासनस्तरावरुन याबाबत काही दखल घेण्याची गरज वाटत नाही. यातून जनतेचा शासन व प्रशासनावरील विश्वास नष्ट होत आहे. सर्वसामान्य जनता हे सर्व किती काळ निमुटपणे सहन करील हे सांगता येत नाही. म्हणून ही परिस्थिती बद्दलण्यासाठी लोकपाल ही संस्था स्थापण करणे महत्वाचे आहे. यामूळे सर्वसामान्य जनतेला न्याय मिळेल तसेच शासन व प्रशासनावर जनतेचे नियंत्रण प्रस्थापित होण्यास मदत होईल. याचे एक पाऊल भारतीय संसदेने अन्ना हजारे यांच्या दबाव व जनतेच्या रेटयामूळे आणि विशेषत: २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या स्वार्थापाटी का होत नाही लोकपाल विधेयक मंजूर करुन सामान्य जनतेला तात्पुरता का होत नाही दिलासा दिला आहे. परंतू लोकपाल अस्तिवात आल्यानंतर त्यांना कितपत अधिकाराचा अवलंबकरु दिल्या जातो, तो कितपत नि:पक्ष, नि:स्वार्थी राहून जनतेच्या तक्रारीचे निवारण करतो. यावर सद्यस्थितीतील सरकारची व लोकपाल संस्थेची यशस्वीता अवलंबून आहे.

देशात राजकीय व्यवस्थेने लोकशाहीच्या नावाखाली "सबकुच चलता है! हयाप्रवृत्तीमूळे वशीलेबाजी, सत्तेचादुरपयोग व दलाल प्रशासकीय संस्कृती निर्माण केली आहे. त्यामूळे प्रमाणिक अधिकारी-कर्मचारी वर्गाला योग्य पध्दतीने व नियमानुसार कार्य करण्यास मोठया अडचणी येत आहेत. कारण प्रशासकीय वर्ग राजकीय नेत्यांच्या तोंडी आदेशाखाली दबून कार्य करत आहे. या पध्दतीने राजकीय व्यवस्था प्रशासनाची निचांकी करीत आहे. ही वस्तुस्थिती आहे. यामुळे प्रमाणिक व हुशार प्रशासकीय अधिकारी या व्यवस्थेत समरस होऊन कार्य करीत आहेत. त्यातून सामान्य जनतेला अत्यंत अडचणी येत आहेत. त्यामूळे लोकपाल बील येणे महत्वाचे आहे. नौकरशाहीला जेंव्हा प्रचंड अधिकार असतात तेंव्हा ती फार सुस्त बनते असा जगभराचा अनुभव आहे. लोकपालची मागणी होऊ लागली तेंव्हा मात्र तेंव्हा अधिकार दिल्यास प्रशासकीय यंत्रणा काम करुन दाखवेल. असे वारंवार सांगण्यात येत. **भ्रष्टाचार निर्मुलनासाठी ॲण्टिकरप्शन ब्युरो, केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) केंद्रिय दक्षता आयोग (सीव्हीसी)**आदी विभाग सध्या आहेत. लोकपालापुढे हे सारे जनू निष्प्रभच ठरतात की काय ! असा सार्वत्रिक समज लोकपाल प्रत्यक्षात कार्यरत होईपर्यंत कायम राहू शकतो. परंतू कितीही बळकट लोकपाल आला आणि त्याने

कितीही प्रमाणिक प्रयत्न करुन तक्रारीचे निवारण करावयाचे ठरविले, तरीही **इंडियन पिनल कोड, क्रिमिनल प्रोसीजर ॲक्ट, इंडियन एव्हिडन्स ॲक्ट** हे कायदे जुनेच असल्याने आणि तसेच ठेवावे लागणार असल्याने लोकपालही सामान्य माणसाच्या तक्रारींना झटपट न्याय देऊ शकतील ही शक्यता थोडी धुसरच दिसून येत आहे.

### उदिष्टये :

**१. लोकपालाची ऐतिहासीक पार्श्वभूमी अभ्यासणे**
**२. लोकपालाची आवश्यकता प्रतिपादन करणे**
**३. लोकपाल संस्थेचा अर्थ अभ्यासणे**

### गृहितके :

**१. लोकपाल विधेयक मंजूर होऊन संस्था स्थापन झाल्यास भ्रष्टाचारावर अंकूश येईल.**
**२. प्रशासकीय व्यवस्था पारदर्शक होण्यास मदत होईल.**

### लोकपाल अर्थः -

लोकपाल म्हणजे सदोष प्रशासनाबाबत नागरिकांच्या तक्रारीची चौकशी करणारी यंत्रणा आहे. त्याशिवाय शासनाने व प्रशासनाने केलेले नियमबाहय कृत्य तसेच असमर्थनीय विलंब, अकार्यक्षमता, जाणिवपूर्वक दुर्लक्ष, पुर्वगृह दुषीत दृष्टीकोन, मनमानी, अन्याय, पक्षपाती निर्णय, अफरातफर, भ्रष्टाचार, अधिकाराचा गैरवापर या ना अशा अनेक बाबीच्या तक्रारीचे निवारण करणारी यंत्रणा म्हणजे लोकपाल आहे. थोडक्यात शासन किंवा कोणत्याही संस्थेबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारीचे निवारण करण्याचे काम लोकपालाचे आहे.

### लोकपालाची पार्श्वभुमी :-

ऑम्बुडसमन ही मूळ संकल्पना स्वीडन या देशातील आहे. न्यायालये आणि तत्सम संस्था याकडून जनतेच्या गा-हाण्याचे, तक्रारीचे निवारण होऊ शकत नाही. म्हणून स्वीडनच्या कायदेमंडळाने ऑम्बुडसमन या अधिका-याची नेमणूक केली. अठराव्या शतकाच्या सुरुवातीला स्वीडनमध्ये लोकपाल हे पद अस्तित्वात आले. १७१३ साली या पदाला फर्स्ट चान्सेलर ऑफ जस्टीस असे संबोधण्यात येत होते. तद्नंतर १८०९ पासून ऑम्बुडसमन असे नाव देण्यात आले. स्वीडनच्या ऑम्बुडसमनची निवड चार वर्षासाठी केली जाते. त्यांची दुस-यावेळी याच पदावर सुध्दा निवड करता येते. तो सरकारला जबाबदार राहत नाही. स्वीडनमध्ये नागरिक व सैनिक यासंबंधीच्या प्रश्नांची चौकशी करण्यासाठी दोन वेगवेगळे ऑम्बुडसमन आहेत. ते शासनाच्या कोणत्याही विभागातून माहिती मागवू शकतो, कागदपत्रे पाहू शकतो. तसेच तो शासनाच्या अधिका-यावर त्यांच्या कार्यावर नियंत्रण, देखरेख ठेवू शकतो. ऑम्बुडसमनला वेगवेगळया देशात वेगवेगळया नावाने ओळखले जाते.

**उदाः**

| अ.क्र. | देश | इ.सन | विविध नावे | देश | इ.सन | विविध नावे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **स्वीडन(प्रथम देश)** | **1809** | ऑम्बुडसमन | **फिनलँड** | **1909** | ऑम्बुडसमन |
| ३ | **डेनमार्क** | **1953-55** | ऑम्बुडसमन | **न्युजिलैंड** | **1962** | **पार्लमेंटरी कमिशनर** |
| ५ | **नॉर्वे** | **1963** | ऑम्बुडसमन | **इग्लंड** | **1967** | **पार्लमेंटरी कमिशनर** |
| ७ | **रशिया** | **1967** | **पार्लमेंटरी कमिशनर** | **अमेरिका** | **1967** | **पार्लमेंटरी कमिशनर** |

फ्रांन्स, युनान आणि तुर्की या देशामध्ये प्रशासकीय न्यायालय आहेत. अशा १४० देशामध्ये या संकल्पनेला स्विकृती देण्यात आली आहे. परंतू त्यांच्या अधिकारात भिन्नता दिसून येते. या सर्वांची मुळ कल्पना ऑम्बुडसमन या संकल्पनेतून घेण्यात आली आहे. यासर्व देशातील लोकपालला चौकशी करण्यासाठी शासन सर्व सहाय्य देण्यास बांधील असते. लोकपालाच्या शिफारशी या सर्व देशामधील शासन कार्यवाहीत आनते. लोकपाल आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल संसदेला सादर करतात. संसदेचा त्यांच्यावर अंतिम अधिकार असतो.

### भारतात लोकपाल संस्थेची आवश्यकता :-

लोकप्रशासन प्रक्रियेमध्ये अंमलबजावणीस्तरावरुन विलंब होतो. त्याचप्रमाणे प्रशासकीय अधिकारी स्वेच्छा निर्णय शक्ती वापरतात. व्यक्तीमधिल भेदाभेदही शासन प्रक्रियेत वा निर्णयाच्या कार्यवाहीमध्ये होत असतो. शिवाय पक्षपात, लाचलूचपत यासारखे

अपप्रकारही लोकप्रशासनामध्ये होतात. प्रशासकीय भ्रष्टाचार आणि राजकीय घोटाळे मोठया प्रमाणावर होत असतांना नागरिकांच्या तक्रारीचे निवारण होण्यासाठी प्रभावी यंत्रणा असणे आवश्यक आहे. सत्तेचा गैरवापर केला जात आहे यातून जनतेच्या तक्रारीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग अनेक मंत्री आणि प्रशासक करुन कोटयावधी रुपायाची मालमत्ता जमवत आहेत. त्यांच्यावर नियंत्रण व अंकूश ठेवणे अशक्य झाले आहे. शासनाच्या सर्व विभागात आणि सर्वस्तरावर भ्रष्टाचार बोकाळला आहे. पंतप्रधानापासून तलाठी, चपराशापर्यंत सत्तेचा आणि सार्वजनिक संपत्तीचा गैरवापर होत असल्याचे चित्र सद्यस्थितीत पहावयास मिळते. भ्रष्टाचार आज जागतिक समस्या बनलेली आहे. जि भारतामध्येसर्व दुर पसरलेली आहे. भ्रष्टाचार मानवी जीवनामध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारे विद्यामान राहिलेला आहे. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये भ्रष्टाचाराचे ४० प्रकार सांगितले आहेत. केंद्रिय निरीक्षण आयोगाने वेगवेगळया २७ प्रकारच्या भ्रष्टाचाराचा उल्लेख केला आहे. भारतात तर भ्रष्टाचाराने सर्व प्रकारच्या पातळया ओलांडल्या आहेत. आज पावलो पावली भ्रष्टाचार करणारे नेते, अधिकारी व त्यांना सहकार्य करणारी जनता दिसून येते. गेल्या ५ ते ६ वर्षापासून वृतपत्रामध्ये दररोज एकतरी बातमी भ्रष्टाचारावर असल्याची दिसते आहे. ज्यामध्ये बोफोर्स दलाली कांड-१९८७ वेस्ट लौंड हेलिकॉप्टर सौदा-१९९१, हर्षद मेहता प्रकरण, चारा घोटाळा, कॉमनवेल्थ खेळ घोटाळा-२०१०, २जी स्पेक्ट्रम घोटाळा-२०१०, कर्नाटक अवैद्य खान घोटाळा-२०१०-११, आपीएल २०१२-१३,-आदर्श चा भ्रष्टाचार, जलसंपदा विभागातील भ्रष्टाचार, एसबीआय बॉकांचे लोन मालिया-२०१७ या प्रमाणे हजारो कोटी रुपयाचा भ्रष्टाचार करुनही ही मंडळी राजरोसपणे शासन स्तरावरील विविध पदावर कार्यरत आहेत. यावरुन असे दिसून येते की, भ्रष्टाचार करणा-या पदाधिका-यावर प्रशासकीय अधिका-यावर शासनाच्या कायद्याचा आणि न्यायालयाचा अंकूश आणि वचक राहिलेली दिसून येत नाही. भ्रष्टाचाराची चौकशी आणि शहनिशा करण्यासाठी विविधि आयोग, समित्या नेमल्या जातात परंतू त्यांच्या अहवालाकडे हेतूपूरसर दुर्लक्ष करुन राजकीय दडपण आणून निःपक्षपातीपणे चौकशी व तपास होऊ दिल्या जात नाही. ही वस्तूस्थिती आहे. अशा गलिच्छ आणि भ्रष्ट वातावरणात स्वच्छ, निकोप, कार्यक्षम आणि कल्याणकारी प्रशासनाची आवश्यकता भासत आहे. भ्रष्टाचारावर नियंत्रण आणि आळा बसवण्यासाठी लोकपाल व लोकायुक्त संस्थाची यासाठी स्थापना होणे अत्यंत गरजेचे आहे.

सर्वेच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्री.पी.बी. गजेंद्रगडकर यांनी लोकपाल पदाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. तसेच १९६६ साली मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने लोकपालचा स्विकार करावा असे सुचविले. या तज्ञाच्या आणि आयोगाच्या शिफारशीनुसार लोकपाल विधेयक ०९ मे १९६८ रोजी लोकसभेत मान्य केले परंतू राज्यसभेकडून हे विधेयक पास होऊ शकले नाही. १९७१,१९७७ सुधारीत विधेयके मांडल्या गेली. परंतू संमत होऊ शकली नाहीत. १९८५ राजीव गांधी सरकारने विधेयक मांडले परंतु नंतर मागे घेतले त्यानंतर १९८९ मध्ये विश्वनाथ प्रताप सिंग यांनीही लोकपाल विधेयक मांडले. परंतू ते पारीत होऊ शकले नाही. तद्नंतर १९९६ देवेगोडा सरकारने मांडले. त्यानंतर १९९८, २००१, २००५, २००८ मध्ये लोकपाल विधेयके मांडली परंतू झाली नाहीत. २२ डिसेंबर २०११ ला राज्यसभेत मांडले परंतू पारित होऊ शकले नाही. शेवटी डिसेंबर २०१३ मध्ये लोकसभा आणि २०१७ मध्ये राज्यसभेने लोकपाल बील मंजूर करुन राष्ट्रपतीकडे पाठविले.

**राज्यातील लोकायूक्त :-**

केंद्रात लोकपाल ही यंत्रणा अजून तरी अस्तित्वात आलेली दिसून येत नाही. परंतू २०११ पर्यंत १७ राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात लोकायुक्त अस्तित्वात आलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) उडिसा-१९७० | २) महाराष्ट्र-१९७१ | ३) राजस्थान -१९७३ |
| ४) बिहार -१९७४ | ५) उत्तरप्रदेश-१९७५ | ६) मध्यप्रदेश |
| ७) आंध्रप्रदेश-१९८३ | ८) हिमाचल प्रदेश-१९८३ | ९) आसाम-१९८५ |
| १०) कर्नाटक-१९८५ | ११) गुजरात -१९८६ | १२) पंजाब-१९९८ |
| १३) दिल्ली-१९९५ -(केंद्रशासित प्रदेश) | १४) केरळ -१९९९ | १५) झारखंड -२००१ |
| १६) हरियाणा - २००३ | १७) छत्तीसगढ -२००३ | १८) उत्तरखंड -२००१ |

देशात सर्वप्रथम लोकायुक्त कायदा करणारे राज्य उडिसा आहे. परंतू उडिसा राज्यामध्ये लोकायुक्ताची नियुक्ती आणि अंमलबजावणी १९८३ मध्ये झाली. परंतू महाराष्ट्र हे १९७१ साली लोकायुक्त व उपलोकायुक्त कायदा करुन त्याची तात्काळ अंमलबजावणी करणारे प्रथम राज्य बनले. हिमाचल प्रदेश, उडिसा आणि केरळ या राज्यामध्ये लोकायुक्ताच्या चौकशी कक्षेत मुख्यमंत्री ठेवले आहेत. लोकपाल विधेयकातील २५३ व्या कलामानुसार राज्यात लोकायुक्त स्थापन करण्याची तरतुद असून या कलमाअंतर्गत राज्यावर केंद्राचा मसुदा बंधनकारक असेल असा उल्लेख आहे.

**समस्या :-**

सद्यस्थितीत लोकपाल विधेयकावरुन वाद चालू आहे. मुळात भ्रष्टाचाराची प्रकरणे हाताळण्यासाठी लोकपाल नावाची शीर्षस्थ वैधानिक यंत्रणा निर्माण करण्यास सरकार तयार झाले तही जनमताच्या रेटयामूळेच. त्यानंतर या लोकपालाच्या कक्षेत पंतप्रधान आनण्याची मागणी सरकारने मान्य केली. यासाठी आवश्यक कायदा करण्याचा मानस सत्ताधारी पक्षाने जाहीर केला आहे. या कायद्याच्या विधेयकाचा मसूदा कसा असावा यावर विविध पातळयावर विचारमंथन सूरु आहे. सरकारने आपल्या पातळीवर सल्लामसलत करुन लोकपाल विधेयकाचा एक मसूदा तयार केला आहे. तो मसूदा लोकपाल विधेयक -२०१० म्हणून ओळखला जातो आहे. परंतू या विधेयकात अनेक समस्या असल्याचे दिसून येते.

१ लोकपालाला एक सल्लागार यंत्रणा बनविण्याचा प्रस्ताव आहे. २. जनतेकडून भ्रष्टाचाराच्या तक्रारी प्राप्त करण्याचा अधिकार नाही त्याशिवाय कुठल्याही एखाद्या घटनेमध्ये, तक्रारीमध्ये कारवाई करण्याचा अधिकारही नसल्याचे म्हटले जाते. ३. लोकपाल विधेयक कायदेशीदृष्टया कमजोर आहे कारण लोकपाल यांना पोलीसी कार्यवाही करण्याचा अधिकारही नाही. त्यामूळे तो सुचना, रिपोर्ट, एफआयआर दाखल करू शकत नाही. यामूळे लोकपाल जी चौकशी अथवा तपास करेल त्याला प्राथमिक चौकशी म्हटल्या जाईल आणि जरी लोकपालाचा अहवाल स्विकारला तरी न्यायालयात आरोपत्र कोन दाखल करेल! कोन खटला चालवेल? हे प्रश्न अनुत्तीर्णच आहेत.४. हा कायदा अस्तिवात आल्यानंतर सीबीआयचे काय होईल ! सीबीआय आणि लोकपाल एकाच गोष्टीची चौकशी करतील का ? सीबीआयकडून राजकीय लोकांची चौकशी करण्याचा अधिकार वापस घेतला जाईल.५. लोकपालाच्या निवड समितीमध्ये उपराष्ट्रपती, पंतप्रधान, दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्षनेते, कायदामंत्री व गृहमंत्र्याचा समावेश आहे. यामध्ये फक्त उपराष्ट्रपती सोडून सर्व राजकीय नेत्याचा समावेश आहे. मग ज्यांच्या भ्रष्टाचार प्रकरणाची चौकशी लोकपाल यांनाचा करावी लागेल त्यामूळे ही चौकशी नि:पक्षपातीपणे होईल का? ६. लोकायुक्त करत असलेल्या कार्याच्या गतीवरुन असे दिसते की, येणा-या तक्रारीचे निवारण जलद होत नाही. पर्यायाने तक्रारीची संख्या वाढत आहे. तक्रारीचे निवारण होण्यासाठी खुप कालावधी लागत आहे. यावरुन असे दिसते की, ज्या उद्देशाच्या पुर्तीसाठी या यंत्रणेची स्थापना झाली आहे तो उद्देशच समाप्त होतो की काय? असे वाटते. उदा. माहिती अधिकार कायदा, ग्राहक मंचाच्या तक्रारी, मानवी हक्क आयोगाकडील तक्रारीचे निवारण आदी. ७. भ्रष्टाचाराशी लढण्यासाठी सर्व पातळयावर बदल होणे काळाची गरज आहे. मात्र एक लोकपाल सर्व काही बदलू शकेल ही कल्पना निष्प्रभ वाटते.

**उपाय :**

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर अनेक आयोग, समित्यांची स्थापणा करुन भ्रष्टाचाराच्या कारणाचा व प्रशासकीय सुधारणांचा मोठया प्रमाणात प्रयत्न केला जातो आहे. जसे सामाजिक, राजकीय, वैयक्तीक नैतिक मुल्याचां -हास होत आसल्याने हे थांबवण्यासाठी विविध यत्रंणा निर्माण केल्या जात आहेत त्यातील महत्वाचे लोकपाल व लोकायुक्त आहेत.नविन लोकपाल कायद्यात पंतप्रधानाविरुध्द तसेच मुख्यमंत्र्याविरुध्द त्यांच्या कार्यकाळातच भ्रष्टाचाराबद्दल तक्रार करण्याची मुभा असायला हवी अर्थात पंतप्रधान, मुख्यमंत्री व न्यायसंस्थेतील उच्च पदस्था विरुध्द भ्रष्टाचाराच्या तक्रारी हाताळतांना जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार नवीन कायद्यात तरतुदी बदले अत्यंत गरजेचे वाटते.

१. सद्यस्थितीत प्रशासनात व राजकीय क्षेत्रात निस्वार्थी, हुशार, अनुभवी, नि:पक्षपाती कर्मचारीवर्ग व लोकसेवक असणे महत्वाचे आहे. २. राज्यकर्त्याचा प्रशासकीय यंत्रणेवर वचक राहण्याऐवजी या यंत्रणेचा वापर आपले हितसंबंध जपण्यासाठी केला जात आहे. त्यामूळे महसूल यंत्रणाच नाही तर पोलिस यंत्रणासूध्दा न्यायालयाप्रमाणे सरकारच्या नियंत्रणाबाहेर ठेवण्याची गरज आहे. त्यासाठी आज सक्षम आणि स्वतंत्र लोकपालाची मागणी होत आहे.३. केंद्रात लोकपाल आणि राज्यामध्ये लोकायुक्त स्वतंत्र घटक असावेत. एसीबी आणि सीबीआयचा या घटनेत समावेश केला जावा त्यांना कोणाचीही परवानगी न घेता एखाद्या अधिकारी व नेत्यांच्या विरुध्द कारवाही करण्याचा अधिकार असावा.४. लोकपाल व लोकायुक्ताला प्रत्येक तक्रार ऐकून द्यावे आणि त्यासंदर्भात तपास करुन भ्रष्ट अधिका-याला आणि पदाधिका-याला पदच्यूत करण्याचा पुर्ण अधिकार असावा.५. लोकपाल आणि लोकायुक्त यांच्या निवडी मध्ये राजकीय नेत्याची भूमिका नसावी त्यांची निवड ही पारदर्शी व जन सहभागितेच्या प्रक्रियेव्दारे व्हावी. ६. भ्रष्टाचाराच्या प्रकरणामध्ये न्यायालयीन कार्यवाही जलद करण्यासाठी घटनेच्या कलम -३११ मध्ये दुरूस्ती केली जावी. या कलमामध्ये सरकारी कर्मचारी अनुषासनात्मक प्रवधानाचा उल्लेख आहे.७.भ्रष्टाचारी व्यक्तीस आरोप सिध्द होताच शिक्षेची अमंजबजावणी केली जावी. निवडणूकीस आजीवन बंदी घातली जावी. त्यांची संपूर्ण मालमत्ता विनाविलंब जप्त केल्या जावी. ८.भ्रष्टाचाराला ज्या गोष्टी कारणीभूत आहेत त्याचा वैज्ञानिक तथा सुव्यवस्थीत अभ्यास करुन ही मनोवृत्त बदलण्याचे उपक्रम राबविले जावे. भ्रष्टाचार ही केवळ आर्थिक समस्या नसून ती राजकीय, सामाजिक व मानसिक समस्या आहे. ९. भ्रष्टाचारी आणि अकार्यक्षम लोकप्रतिनिधीना परत बोलावण्याचा अधिकार मतदाराना असावा. १०. राजकीय पक्षांना आणि त्यांच्या व्यवहारांना माहितीच्या अधिकाराखाली आण्याचा निर्णय घेणे तितकेच महत्वाचे आहे.

**सारांश :**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारीचे परिमार्जन, भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी विधिमंडळ व संसद या देशातील सर्वोच्च राजकीय संस्थेला जबाबदार असणारा अधिकारी नियुक्त करणे महत्वाचे आहे हे तितकेच वास्तव आहे.

## संदर्भसूची:-


**१. डॉ.श्याम सिरसाठ," लोकप्रशासनशास्त्र", ज्ञानसमिधा पब्लिकेशन्सवर्ल्ड औरंगाबाद, २०१०**
**२. डॉ. बी. एल. फाडिया, "उच्चस्तर लोकप्रशासन", साहित्य भवन- नई दिल्ली, २००३.**
**३. पाटील पी.बी.,"लोकप्रशासन",फडकेप्रकाशन, कोल्हापूर**
**४. न्या. लेंटिन- सकाळ , लोकपाल कायदा हवाच, १९९०**
**५. योजना माशिक अप्रैल २०११, सिविल सर्विसेज क्रॉनिकल - नवम्बर २०११**

**वेबसाईट :**

**१. indiaagainstcorruption@gmail.com**
**२. parivartanindia@gmail.com**

**वृत्तपत्रे :**

१. दै. लोकसत्ता- ८ एप्रिल २०११, २०१७.
२. दै. सकाळ - २०११
३. दै. सकाळ - २२ डिसेंबर २०१३.